भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# वास्तुशास्त्रज्ञ अधिनियम, १९७२

**(सन १९७२ चा अधिनियम क्रमांक २०)**

[२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान]

# The Architects Act, 1972

**(Act No. 20 of 1972)**

[*As in force on the 26th February, 2004*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[**किंमत :** रुपये १७.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि आर्किटेक्स् ॲक्ट, १९७२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर, २००४ यात पृष्ठ १७८ ते १८९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्रधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : १४ ऑक्टोबर, २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the The Architects Act, 1972 as on the 26th February, 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette* of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October, 2004 on pages 178 to 189.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated : 14th October, 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the
Government of India.

# वास्तुशास्त्रज्ञ अधिनियम, १९७२

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### वास्तुशास्त्र परिषद

३. वास्तुशास्त्र परिषदेची घटना.

४. परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.

५. निवडणुकांची पद्धत.

६. पदावधी आणि नैमित्तिक रिक्त पदे.

७. परिषद, कार्यकारी समिती किंवा इतर समित्या यांची कृती किंवा कार्यवाही यांची विधिग्राह्यता, रिक्त पद, इत्यादी कारणावरून विधिबाह्य न ठरणे.

८. नि:समर्थता.

९. परिषदेच्या सभा.

१०. कार्यकारी समिती आणि इतर समित्या.

११. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांची फी आणि भत्ते.

१२. अधिकारी आणि अन्य कर्मचारी.

१३. परिषदेची वित्त व्यवस्था.

१४. भारतातील प्राधिकरणांनी अर्हतांना दिलेली मान्यता.

१५. विदेशातील प्राधिकारणांनी दिलेल्या वास्तुशास्त्रातील अर्हतांना मान्यता.

१६. अनुसूचित विशोधित करण्याची केंद्र सरकारची शक्ती.

१७. मान्यतेचा परिणाम.

१८. पाठ्यक्रम आणि परीक्षा या संबंधीची माहिती मागविण्याची शक्ती.

१९. परीक्षांचे निरीक्षण.

२०. मान्यता मागे घेणे.

२१. वास्तुशास्त्र शिक्षणाची किमान मानके.

२२. व्यावसायिक वर्तन.

### प्रकरण तीन

### वास्तुशास्त्रज्ञांची नोंदणी

२३. नोंदवही तयार करणे आणि ठेवणे.

२४. पहिल्या वेळी नोंदवही तयार करणे.

२५. नोंदवहीमध्ये नोंद होण्यासाठी अर्हता.

२६. नंतरच्या नोंदणीची कार्यपद्धती.

२७. नवीकरण फी.

२८. अतिरिक्त अर्हतेची नोंद.

२९. नोंदवहीमधून काढून टाकणे.

३०. गैरवर्तनाच्या संबंधातील चौकशीमधील कार्यवाही.

३१. प्रमाणपत्रे स्वाधीन करणे.

३२. नोंदवहीमध्ये पुनःस्थापना.

३३. प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.

३४. नोंदवहीचे मुद्रण.

३५. नोंदणीचा परिणाम.

प्रकरण चार

**संकीर्ण**

३६. नोंदणी झालेली असल्याचा खोटा दावा सांगण्याबद्दल शास्ती.

३७. अभिधानाच्या वापरास प्रतिषेध.

३८. नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात कसूर.

३९. अपराधांची दखल.

४०. परिषदेने द्यावयाची माहिती व तिचे प्रकाशन.

४१. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

४२. परिषदेचे सदस्य आणि अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

४३. अडचणी दूर करण्याची शक्ती.

४४. केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती.

४५. विनियम करण्याची परिषदेची शक्ती.

**अनुसूची.**

# वास्तुशास्त्रज्ञ अधिनियम, १९७२

**(१९७२ चा अधिनियम क्रमांक २०)**

(२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान)

[ ३१ मार्च, १९९२ ]

**वास्तुशास्त्रज्ञांची नोंदणी आणि त्याच्याशी संबंधित बाबी यांकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास "वास्तुशास्त्रज्ञ अधिनियम, १९७२" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल.

**२.** या अधिनियमामध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "वास्तुशास्त्रज्ञ" याचा अर्थ , त्या त्या वेळी ज्या व्यक्तीचे नाव नोंदवहीमध्ये नोंदलेले असेल ती व्यक्ती, असा आहे ;

(ख) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेली वास्तुशास्त्र परिषद, असा आहे ;

(ग) "भारतीय वास्तुशास्त्रज्ञ संस्था" याचा अर्थ, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० या अन्वये नोंदवलेली भारतीय वास्तुशास्त्रज्ञ संस्था, असा आहे ;

(घ) "मान्यताप्राप्त अर्हता" याचा अर्थ, त्या त्या वेळी अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेली किंवा कलम १५ अन्वये अधिसूचित केलेली वास्तुशास्त्रामधील कोणतीही अर्हता, असा आहे ;

(ङ) "नोंदवही" याचा अर्थ, कलम २३ अन्वये ठेवलेली वास्तुशास्त्रज्ञांची नोंदवही, असा आहे ;

(च) "विनियम" याचा अर्थ, परिषदेने या अधिनियमान्वये केलेला विनियम, असा आहे ;

(छ) "नियम" याचा अर्थ, केंद्र सरकारने या अधिनियमान्वये केलेला नियम, असा आहे.

## प्रकरण दोन

## वास्तुशास्त्र परिषद

**३.** (१) केंद्र सरकार **राजपत्रात** अधिसूचना प्रकाशित करून त्याद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून वास्तुशास्त्र परिषद या नावाची एक परिषद घटित करील ; ही परिषद म्हणजे उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला एक निगमनिकाय असेल, त्याला स्थावर व जंगम अशा दोन्ही संपत्ती संपादन करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल व त्या नावाने तिला किंवा तिच्यावर दावा लावता येईल. **वास्तुशास्त्र परिषदेची घटना.**

(२) परिषदेचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे किंवा केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा इतर ठिकाणी असेल.

(३) परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) भारतीय वास्तुशास्त्रज्ञ संस्थेने तिच्या सदस्यांमधून निवडून दिलेले मान्यताप्राप्त अर्हता असणारे पाच वास्तुशास्त्रज्ञ ;

(ख) भूतपूर्व शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, यांचा निर्णय क्रमांक एफ १६-१०/४४ -इ - तीन, दिनांक ३० नोव्हेंबर, १९४५ याद्वारे, स्थापन करण्यात आलेल्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती ;

(ग) भारतातील मान्यताप्राप्त अर्हतांसाठी पूर्णकालिक शिक्षण देणाऱ्या वास्तुशास्त्र संस्थांच्या प्रमुखांनी त्यांच्यामधून निवडून दिलेल्या पाच व्यक्ती ;

(घ) संरक्षण आणि रेल्वे यासंबंधीचे शासकीय कामकाज केंद्र सरकारच्या ज्या मंत्रालयाकडे सोपवलेले असेल त्या मंत्रालयाचे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ आणि केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागातील वास्तुशास्त्रज्ञ संघटनेचा प्रमुख, पदसिद्ध ;

(ङ) केंद्र सरकारने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती ;

(च) प्रत्येक राज्याच्या शासनाने नामनिर्देशित केलेला त्या राज्यातील एक वास्तुशास्त्रज्ञ ;

(छ) इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) यांनी आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती ; आणि

(ज) इन्स्टिटयूशन ऑफ सर्व्हेअर्स ऑफ इंडिया यांनी आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) " याचा अर्थ, इंडियन कंपनीज ॲक्ट, १९१३ या अन्वये प्रथम १९२० मध्ये नोंदणी करण्यात आलेली आणि नंतर १९३५ मध्ये रॉयल चार्टर द्वारे नियमित करण्यात आलेली इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), असा आहे.

(ख) " इन्स्टिटयूशन ऑफ सर्व्हेअर्स ऑफ इंडिया " याचा अर्थ, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० या अन्वये नोंदणी करण्यात आलेली इन्स्टिट्यूशन ऑफ सर्व्हेअर्स, असा आहे.

(४) पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नोंदवही तयार करण्यात येईपर्यंत केंद्र सरकारला, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस् यांच्याशी विचारविनियम करून, कलम २५ अन्वये नोंदणीसाठी अर्हताप्राप्त असतील अशा, उक्त खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्ती पहिल्या परिषदेवर नामनिर्देशित करता येतील, आणि अशा रीतीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कालावधीसाठी पद धारण करतील.

(५) पोट-कलम (३) च्या खंड (च) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नोंदवही तयार करण्यात येईपर्यंत केंद्र सरकारला, संबंधित राज्य शासनाशी विचारविनियम करून, कलम २५ अन्वये नोंदणीसाठी अर्हताप्राप्त असतील अशा, उक्त खंड (च) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्ती पहिल्या परिषदेवर नामनिर्देशित करता येतील, आणि अशा रीतीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कालावधीसाठी पद धारण करतील.

परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष.

४. (१) परिषदेचे सदस्य त्यांच्यामधून परिषदेच्या अध्यक्षाची व उपाध्यक्षाची निवड करतील परंतु, परिषद प्रथम घटित झाल्यानंतर आणि अध्यक्षाची निवड करण्यात येइपर्यंत, केंद्र सरकारने या संबंधात नामनिर्देशित केलेला परिषदेचा सदस्य अध्यक्षाची कामे पार पाडील.

(२) निवडून देण्यात आलेला परिषदेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, तीन वर्षांची मुदत संपणे किंवा, तो परिषदेचा सदस्य असण्याचे बंद होणे यांपैकी जी अगोदर घडेल त्या घटनेपर्यंत, पद धारण करील. परंतु, तो परिषदेचा सदस्य असण्याच्या अधीन राहून फेरनिवड होण्यास पात्र असेल :

परंतु,

(क) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा उपाध्यक्षाला, किंवा, प्रकरणपरत्वे, अध्यक्षाला उद्देशून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेल ;

(ख) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा, त्याच्या पदाची तीन वर्षांची मुदत समाप्त झाली तरी, त्याचा उत्तराधिकारी पदग्रहण करीपर्यंत, पद धारण करण्याचे चालू ठेवील.

(३) परिषदेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शक्तींचा वापर करतील आणि कर्तव्ये पार पाडतील.

निवडणुकांची पद्धत.

५. (१) या प्रकरणान्वये घ्यावयाच्या निवडणुका नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने घेण्यात येतील.

(२) अशा कोणत्याही निवडणुकांबाबत कोणताही विवाद उद्‌भवल्यास परिषद ती बाब केंद्र सरकार या संबंधात **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा एका अधिकरणाकडे निर्दिष्ट करील आणि अधिकरणाचा त्यावरील निर्णय अंतिम राहील :

परंतु, निवडणुकीच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या संबंधित व्यक्तीने असा निर्णय घोषित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत परिषदेकडे केलेल्या अर्जावरून करण्यात येईल अशा निर्देशाखेरीज इतर कोणताही निर्देश करण्यात येणार नाही.

(३) अधिकरणाचा खर्च परिषदेकडून भागविण्यात येईल.

पदावधी व नैमित्तिक रिक्त पदे.

६. (१) या कलमाच्या उपबंधाच्या अधीन राहून, निर्वाचित किंवा नामनिर्देशित सदस्य त्याच्या निवडणुकीच्या किंवा नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांची मुदत संपणे अथवा त्याचा उत्तराधिकारी रीतसर निर्वाचित किंवा नामनिर्देशित होणे यांपैकी जी नंतर घडेल त्या घटनेपर्यंत, त्याचे पद धारण करील.

(२) निर्वाचित सदस्य हा अध्यक्षाला किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षाला उद्देशून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेल, आणि त्यानंतर अशा सदस्याचे पद रिक्त होईल.

(३) सदस्याने, पुढील प्रसंगी आपले पद रिक्त केल्याचे मानण्यात येईल :---

(एक) परिषदेच्या लागोपाठच्या तीन सामान्य सभांना तो परिषदेच्या मते पुरेशी असेल अशा सबबीवाचून अनुपस्थित राहिला तर ; किंवा

(दोन) कलम ३, पोट-कलम (३), खंड (क), खंड (छ) किंवा खंड (ज) मध्ये निर्देशिलेल्या ज्या निकायाने त्याला निवडून दिले होते, किंवा प्रकरणपरत्वे, नामनिर्देशित केले होते त्या निकायाचा सदस्य राहिला नाही तर ; किंवा

(तीन) कलम ३, पोट-कलम (३), खंड (ग) अन्वये त्याला निवडून देण्यात आलेले असेल त्याबाबतीत, उक्त खंडामध्ये निर्देशिलेल्या संस्थेचा प्रमुख म्हणून त्याची नियुक्ती समाप्त झाली तर.

(४) परिषदेमध्ये निमित्तवशात् रिक्त होणारे पद नवीन निवडणूक घेऊन, किंवा, प्रकरणपरत्वे, नामनिर्देशन करून भरण्यात येईल आणि ते रिक्त पद भरण्यासाठी अशा रीतीने निवडण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती, ती ज्या सदस्याची जागा घेईल तो सदस्य ज्या मुदतीसाठी निवडण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आला, त्या अवधीपैकी केवळ उर्वरित अवधीसाठी ते पद धारण करील.

(५) परिषदेचे सदस्य सलग तीन अवधीपेक्षा अधिक नसतील इतक्या अवधींसाठी फेरनिवडणुकीस किंवा फेरनामनिर्देशनास पात्र असतील.

**परिषद, कार्यकारी समिती किंवा इतर समित्या यांची कृती किंवा कार्यवाही यांची विधिग्राह्यता, रिक्त पद, इत्यादी कारणावरून विधिबाह्य न ठरणे.**

७. परिषदेची किंवा कार्यकारी समितीची किंवा इतर कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ पुढील कारणावरून विधिबाह्य ठरणार नाही---

(क) परिषद, कार्यकारी समिती किंवा इतर कोणतीही समिती यांमधील कोणतेही रिक्त पद किंवा तिच्या घटनेमधील कोणताही दोष, किंवा

(ख) तिचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या निवडणुकीमधील किंवा नामनिर्देशनातील कोणताही दोष, किंवा

(ग) प्रकरणाच्या गुणावगुणांवर परिणाम न करणारी कार्यपद्धतीमधील कोणतीही नियमबाह्य गोष्ट.

८. एखादी व्यक्ती, परिषदेचा सदस्य म्हणून निवडली किंवा नामनिर्देशित केली जाण्यास पुढील बाबतीत पात्र असणार नाही.---

(क) ती अविमुक्त नादार असेल तर, किंवा

(ख) भारतातील न्यायालयाने तिला कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवून दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिलेली असेल तर,

आणि तिच्या सुटकेनंतर पाच वर्षांच्या आणखी कालावधीपर्यंत ती अपात्र असण्याचे चालू राहील.

**परिषदेची सभा**

९. (१) विनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा वेळी व ठिकाणी दर सहा महिन्यांतून किमान एकदा परिषदेची सभा घेण्यात येईल आणि परिषदांच्या सभांमध्ये, कामकाज चालविण्याच्या संबंधात विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करण्यात येईल.

(२) विनियमांद्वारे अन्यथा विहित केलेले नसेल तर, परिषदेचे नऊ सदस्य हजर असल्यास गणपूर्ती होईल, आणि हजर असणाऱ्या आणि मत देणाऱ्या सदस्यांच्या बहुमतानुसार परिषदेच्या सर्व कृतींचा निर्णय करण्यात येईल.

(३) मतांची विभागणी समान झाल्यास, अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष किंवा दोघांच्याही अनुपस्थितीत सभेच्या अध्यक्षस्थानी असणारा सदस्य याला दुसरे निर्णयक मत असेल व तो त्या मताचा वापर करील.

**कार्यकारी समिती आणि इतर समित्या.**

१०. (१) परिषद आपल्या सदस्यांमधून एक कार्यकारी समिती घटित करील आणि या अधिनियमान्वयेची आपली कामे पार पाडण्यासाठी परिषदेला आवश्यक वाटतील अशा सर्वसाधारण किंवा विशेष प्रयोजनांसाठी परिषदेला इतर समित्या देखील घटित करता येतील.

(२) कार्यकारी समितीमध्ये परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हे पदसिद्ध सदस्य आणि परिषद आपल्या सदस्यांमधून निवडील असे पाच अन्य सदस्य, यांचा समावेश असेल.

(३) परिषदेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे कार्यकारी समितीचे अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष असतील.

(४) कार्यकारी समितीचा सदस्य, परिषदेचा सदस्य म्हणून त्याचा पदावधी समाप्त होईपर्यंत, कार्यकारी समितीचा सदस्य म्हणून त्याचे पद धारण करील, परंतु, तो, परिषद सदस्य राहिला असेल तर फेरनिवडणुकीस पात्र असेल.

(५) कार्यकारी समिती, या अधिनियमान्वये तिला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती व तिच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये यांच्याखेरीज विनियमांद्वारे विहित करता येतील अशा शक्तींचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांची फी आणि भत्ते.

**११.** परिषद यासंबंधात केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीने निश्चित करील अशी फी व भत्ते मिळण्यास परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि अन्य सदस्य हक्कदार असतील.

अधिकारी आणि कर्मचारी.

**१२.** (१) परिषद---

(क) एका निबंधकाची नियुक्ती करील, तो परिषदेचा सचिव म्हणून काम करील आणि परिषदेने ठरवल्यास तिचा कोषाध्यक्ष म्हणूनही त्याला काम करता येईल ;

(ख) या अधिनियमान्वयेची आपली कामे पार पाडणे परिषदेस शक्य व्हावे यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा अन्य अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करील ;

(ग) केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीने परिषदेचे अधिकारी व अन्य कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती निश्चित करील.

(२) पोटकलम (१), खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिषद प्रथम घटित झाल्यापासूनच्या पहिल्या तीन वर्षांसाठी परिषदेचा निबंधक ही, केंद्र सरकारने नियुक्त केलेली व्यक्ती असेल, आणि तो केंद्र सरकारची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करील.

(३) या कलमान्वये नियुक्त केलेल्या सर्व व्यक्ती परिषदेच्या कर्मचारी असतील.

परिषदेची वित्त व्यवस्था.

**१३.** (१) परिषदेच्या व्यवस्थापनाखाली व नियंत्रणाखाली एक निधी स्थापन करण्यात येईल आणि परिषदेला मिळालेला सर्व पैसा त्यामध्ये भरण्यात येईल व परिषदेने योग्य प्रकारे केलेला सर्व खर्च व पत्करलेली सर्व दायित्वे या निधीमधून भागवण्यात येतील.

(२) निधीमध्ये त्या त्या वेळी जमाखाती शिल्लक असलेला कोणताही पैसा परिषदेला शासकीय प्रतिभूतीमध्ये किंवा केंद्र सरकारने संमती दिलेल्या इतर कोणत्याही प्रतिभूतीमध्ये गुंतवता येईल.

(३) परिषद, महसूल व भांडवल वेगवेगळे दर्शवून निधीचे योग्य लेखे ठेवील.

(४) परिषदेचे लेखे प्रत्येक वर्षी नियुक्त करावयाच्या लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षेच्या अधीन असतील.

(५) परिषद, प्रत्येक वर्षाच्या अखेरीस, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, परंतु लगतनंतरच्या वर्षाच्या ३० सप्टेंबर पेक्षा उशिरा नाही अशा लेखापरीक्षित लेख्यांची एक प्रत त्याचप्रमाणे परिषदेचा त्या वर्षाचा अहवाल **राजपत्रामध्ये** प्रकाशित करण्याची व्यवस्था करील आणि उक्त लेख्यांच्या आणि अहवालाच्या प्रती केंद्र सरकारकडे पाठविण्यात येतील.

(६) निधीमध्ये पुढील पैशाचा समावेश असेल :---

(क) अनुदान, देणगी, किंवा ठेव म्हणून केंद्र सरकारकडून मिळालेले सर्व पैसे ;

(ख) या अधिनियमान्वये फी म्हणून किंवा अन्यथा मिळालेल्या कोणत्याही रकमा.

(७) परिषदेच्या जमाखाती असलेल्या ज्या पैशांचे ताबडतोब उपयोजन करता येत नसेल ते सर्व पैसे भारतीय स्टेट बँकेकडे किंवा बँक व्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० याच्या पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही बँकेकडे ठेव म्हणून ठेवण्यात येतील.

भारतातील प्राधिकरणांनी अर्हतांना दिलेली मान्यता.

**१४.** (१) अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या किंवा कलम १५ अन्वये अधिसूचित केलेल्या अर्हता या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त अर्हता असतील.

(२) अनुसूचीमध्ये समाविष्ट नसलेली वास्तुशास्त्रातील अर्हता प्रदान करणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाला अशा अर्हतेला मान्यता मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे अर्ज करता येईल आणि केंद्र सरकार परिषदेबरोबर विचारविनिमय केल्यानंतर अशी अर्हता अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यासाठी ती अनुसूची **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विशोधित करू शकेल, आणि अशा कोणत्याही

अधिसूचनेमध्ये असाही निदेश देता येईल की, ही वास्तुशास्त्रातील अर्हता विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात येईल त्यावेळीच केवळ ती मान्यताप्राप्त अर्हता असेल असे घोषित करणारी नोंद अनुसूचीमध्ये अशा अर्हतेसमोर करण्यात यावी :

परंतु, पहिली परिषद घटित करण्यात येईपर्यंत, पूर्वोक्त अशी कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी केंद्र सरकार एका तज्ञ समितीचा सल्ला घेईल. ही तज्ञ समिती, केंद्र सरकारने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करावयाचे तीन सदस्य मिळून बनलेली असेल.

**विदेशातील प्राधिकरणांनी दिलेल्या वास्तुशास्त्रातील अर्हतांना मान्यता.**

**१५.** (१) केंद्र सरकार परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, भारताबाहेरील कोणत्याही देशामधील ज्या कोणत्याही विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही संस्थेच्या संबंधात वास्तुशास्त्रातील अर्हतेच्या मान्यतेसाठी देवाणघेवाणीची योजना अंमलात नसेल त्या विद्यापीठाने किंवा संस्थेने दिलेली वास्तुशास्त्रातील अर्हता ही, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त अर्हता असेल किंवा विनिर्दिष्ट दिनांकानंतर किंवा विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी देण्यात येईल त्यावेळीच केवळ ती मान्यताप्राप्त असेल :

परंतु, पहिली परिषद घटित करण्यात येईपर्यंत केंद्र सरकार पूर्वोक्त अशी कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी, कलम १४, पोटकलम (२) च्या परंतुकान्वये स्थापन केलेल्या तज्ञ समितीचा सल्ला घेईल.

(२) भारताबाहेरील कोणत्याही राज्यातील किंवा देशातील ज्या प्राधिकरणाकडे अशा राज्याच्या किंवा देशाच्या विधि अन्वये वास्तुशास्त्रज्ञांची नोंदवही ठेवण्याचे काम सोपवण्यात आलेले असेल त्या प्राधिकरणाबरोबर वास्तुशास्त्रातील अर्हतांना मान्यता देण्यासाठी देवाणघेवाणीची योजना निश्चित करण्यासाठी परिषदेला वाटाघाटी करता येतील आणि अशा कोणत्याही योजनेच्या अनुषंगाने केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, वास्तुशास्त्रातील ज्या अर्हतेला मान्यता देण्यात यावी, असा निर्णय परिषदेने घेतलेला असेल ती अर्हता या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मान्यताप्राप्त अर्हता असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा कोणत्याही अधिसूचनेमध्ये असाही निदेश देता येईल की, अशी वास्तुशास्त्रातील अर्हता विनिर्दिष्ट दिनांकानंतर किंवा विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी देण्यात येईल त्यावेळीच केवळ तिला अशी मान्यता मिळेल.

**अनुसूची विशोधित करण्याची केंद्र सरकारची शक्ती.**

**१६.** कलम १४, पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वास्तुशास्त्रातील कोणत्याही अर्हतेच्या संबंधात अनुसूची मध्ये नोंद करण्यात यावी, असा निदेश देऊन अनुसूची विशोधित करता येईल.

**मान्यतेचा परिणाम.**

**१७.** इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीन राहून कोणतीही मान्यताप्राप्त अर्हता नोंदवहीमध्ये नावनोंदणी केली जाण्यासाठी पुरेशी असेल.

**पाठ्यक्रम आणि परीक्षा यासंबंधीची माहिती मागविण्याची शक्ती.**

**१८.** मान्यताप्राप्त अर्हता मिळविण्यासाठी पूर्ण करावे लागणारे पाठ्यक्रम व द्याव्या लागणाऱ्या परीक्षा, असे पाठ्यक्रम पूर्ण करण्यासाठी व परीक्षा देण्यासाठी आवश्यक असलेले आणि ज्या वयात अशी अर्हता प्रदान करण्यात येते ते वय यासंबंधात आणि सर्वसाधारणपणे अशी अर्हता मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींच्या संबंधात परिषद वेळोवेळी मागवील अशी माहिती अशी अर्हता प्रदान करणारे भारतातील प्रत्येक प्राधिकरण देईल.

**परीक्षांचे निरीक्षण.**

**१९.** (१) परिषदेने कोणतेही विनियम केलेले असल्यास, त्या विनियमांच्या अधीन राहून कार्यकारी समिती, वास्तुशास्त्राचे शिक्षण देण्यात येत असेल. असे कोणतेही महाविद्यालय किंवा संस्था प्रदान करत असलेल्या वास्तुशास्त्रातील अर्हतेला मान्यता देण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याच्या प्रयोजनार्थ, त्या महाविद्यालयाचे किंवा संस्थेचे निरीक्षण करण्यासाठी अथवा त्या महाविद्यालयाकडून किंवा संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेच्या वेळी हजर राहण्यासाठी समितीला आवश्यक वाटतील इतक्या निरीक्षकांची नियुक्ती करील.

(२) कोणत्याही प्रशिक्षणाच्या किंवा परीक्षेच्या चालनामध्ये निरीक्षक हस्तक्षेप करणार नाहीत. परंतु, कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, निवासव्यवस्था, प्रशिक्षण आणि वास्तुशास्त्राचे शिक्षण देण्यासाठी विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा इतर सोयी यांसह अशा शिक्षणाच्या मानकांच्या पर्याप्ततेबाबत किंवा ते निरीक्षक हजर राहतील अशा प्रत्येक परीक्षेच्या पर्याप्ततेबाबत कार्यकारी समितीला अहवाल देतील.

(३) कार्यकारी समिती अशा अहवालाची एक प्रत त्या महाविद्यालयाकडे किंवा संस्थेकडे पाठवील आणि अहवालाच्या प्रती, त्यावर महाविद्यालयाचा किंवा संस्थेचा काही अभिप्राय असल्यास त्यासह, केंद्र सरकारकडे देखील पाठवील.

**मान्यता मागे घेणे.**

**२०.** (१) कार्यकारी समितीचा अहवाल मिळाल्यानंतर ---

(क) कोणत्याही महाविद्यालयामध्ये किंवा संस्थेमध्ये पूर्ण करावयाचा पाठ्यक्रम आणि द्यावयाची परीक्षा अथवा त्या महाविद्यालयाकडून किंवा संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेमध्ये उमेदवाराकडून अपेक्षित असलेले नैपुण्य, किंवा

(ख) अशा महाविद्यालयामध्ये किंवा संस्थेमध्ये उपलब्ध करून दिलेला कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, निवासव्यवस्था, कर्मचारीवर्गासाठी व प्रशिक्षणासाठी असलेल्या इतर सोयी, या गोष्टी विनियमांद्वारे विहित केलेल्या मानकांनुरूप नाहीत, असे परिषदेला दिसून येईल तेव्हा परिषद समुचित शासनाकडे तशा आशयाचे एक अभिवेदन करील.

(२) असे अभिवेदन विचारात घेतल्यानंतर समुचित शासन, त्याला द्यायचा असेल अशा अभिप्रायासह ते अभिवेदन संबंधित महाविद्यालयाकडे किंवा संस्थेकडे पाठवील, त्यासोबत महाविद्यालयाने, किंवा, प्रकरणपरत्वे, संस्थेने आपले स्पष्टीकरण समुचित शासनाकडे ज्या कालावधीत सादर करावयाचे त्या कालावधीची सूचनाही असेल.

(३) स्पष्टीकरण मिळाल्यानंतर किंवा निश्चित केलेल्या कालावधीत कोणतेही स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही तर, तो कालावधी समाप्त झाल्यानंतर राज्य शासन, पोटकलम (५) च्या खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या संबंधात, केंद्र सरकारकडे आपल्या शिफारशी पाठवील.

(४) केंद्र सरकार,—

(क) पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या संबंधात कोणतीही आणखी चौकशी करणे त्यास योग्य वाटल्यास अशी चौकशी केल्यानंतर, किंवा

(ख) पोटकलम (५) च्या खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या महाविद्यालयाकडून किंवा संस्थेकडून स्पष्टीकरण मिळाल्यानंतर, अथवा निश्चित केलेल्या कालावधीत कोणतेही स्पष्टीकरण सादर करण्यात आले नाही तर तो कालावधी समाप्त झाल्यानंतर,

**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, अशा महाविद्यालयाने, किंवा, प्रकरणपरत्वे, संस्थेने प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील अर्हता ही एका विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी देण्यात आली असेल तरच केवळ ती मान्यताप्राप्त अर्हता असेल, असे घोषित करणारी नोंद अनुसूचीमध्ये अशा अर्हतेसमोर करण्यात यावी आणि अनुसूची याप्रमाणे विशोधित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(५) या कलमाच्या प्रयोजनार्थ, " समुचित शासन " याचा अर्थ,---

(क) संसदेच्या एखाद्या अधिनियमाद्वारे स्थापन करण्यात आलेल्या किंवा केंद्र सरकारकडून व्यवस्थापन, नियंत्रण किंवा वित्त व्यवस्था करण्यात येत असलेल्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या संबंधात केंद्र सरकार, असा आहे, आणि

(ख) इतर कोणत्याही बाबतीत, राज्य शासन, असा आहे.

वास्तुशास्त्र शिक्षणाची किमान मानके.

२१. भारतातील महाविद्यालयांनी किंवा संस्थांनी मान्यताप्राप्त अर्हता प्रदान कराव्या यासाठी आवश्यक असलेली वास्तुशास्त्र शिक्षणाची किमान मानके परिषदेला विहित करता येतील.

व्यावसायिक वर्तन.

२२. (१) परिषदेला वास्तुशास्त्रज्ञांसाठी व्यावसायिक वर्तन व शिष्टाचार यांची मानके आणि नीतिसंहिता विनियमांद्वारे विहित करता येतील.

(२) परिषदेने पोटकलम (१) अन्वये केलेल्या विनियमांचे कोणकोणते भंग हे कोणत्याही व्यावसायिक संबंधात अतिनिंद्य वर्तन म्हणजे व्यावसायिक गैरवर्तन ठरतील ते, अशा विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करता येईल आणि त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असा उपबंध परिणामकारक असेल.

## प्रकरण तीन

## वास्तुशास्त्रज्ञांची नोंदवही

नोंदवही तयार करणे आणि ठेवणे.

२३. (१) केंद्र सरकार, शक्य होईल तितक्या लवकर, यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने भारतातील वास्तुशास्त्रज्ञांची नोंदवही तयार करण्याची व्यवस्था करील.

(२) परिषद घटित करण्यात आल्यानंतर ती या अधिनियमाच्या उपबंधानुसार नोंदवही ठेवण्याचे कर्तव्य करील ;

(३) नोंदवहीत पुढील तपशील समाविष्ट असेल :---

(क) वास्तुशास्त्रज्ञांचे संपूर्ण नाव, जन्म दिनांक, राष्ट्रीयत्व आणि निवासस्थानाचा पत्ता ;

(ख) नोंदणीसाठी असलेली त्याची अर्हता व ती अर्हता त्याने ज्या दिनांकास प्राप्त केली तो दिनांक व ज्याने ती अर्हता प्रदान केली ते प्राधिकरण ;

(ग) नोंदवहीमध्ये त्याचे नाव प्रथम दाखल केल्याचा दिनांक ;

(घ) त्याचा व्यवसायिक पत्ता ; आणि

(ङ) नियमांद्वारे विहित करण्यात येईल असा आणखी तपशील.

**पहिल्या वेळी नोंदवही तयार करणे.**

२४. (१) वास्तुशास्त्रज्ञांची नोंदवही पहिल्या वेळी तयार करण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एक नोंदणी अधिकरण घटित करील, हे अधिकरण केंद्र सरकारच्या मते वास्तुशास्त्राचे ज्ञान किंवा त्यामधील अनुभव असणाऱ्या तीन व्यक्ती मिळून बनेल आणि कलम १२ अन्वये नियुक्त केलेला निबंधक, अधिकरणाचा सचिव म्हणून काम पाहील.

(२) त्याच किंवा तशाच अधिसूचनेद्वारे केंद्र सरकार, नोंदणीसाठी ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकापूर्वी नोंदणी अधिकरणाकडे अर्ज करावयाचा तो दिनांक नियत करील. अशा अर्जासोबत नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी फी देण्यात येईल.

(३) नोंदणी अधिकरण नियत दिनांकास किंवा त्यापूर्वी मिळालेल्या प्रत्येक अर्जाची तपासणी करील आणि कलम २५ अन्वये नोंदणी करण्यासाठी अर्जदार अर्हताप्राप्त आहे याबद्दल अधिकरणाची खात्री झाली तर ते अर्जदाराच्या नावाची नोंद नोंदवहीमध्ये करण्याचा निदेश देईल.

(४) त्यानंतर, अशा रीतीने तयार केलेली पहिली नोंदवही केंद्र सरकार निदेश देईल अशा रीतीने प्रकाशित करण्यात येईल आणि अशा रीतीने प्रकाशित केलेल्या नोंदवहीमध्ये नोंदणी अधिकरणाचा जो निर्णय व्यक्त किंवा ध्वनित झाला असेल त्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला केंद्र सरकारने या संबंधात **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त केलेल्या प्राधिकरणाकडे अशा निर्णयाविरुद्ध अशा प्रकाशनाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अपील करता येईल.

(५) पोटकलम (४) अन्वये नियुक्त केलेले प्राधिकरण, निर्णयाचा परिणाम झालेल्या व्यक्तीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, आणि संबद्ध अभिलेख मागवल्यावर,त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल.

(६) निबंधक, पोटकलम (४) अन्वये नियुक्त केलेल्या प्राधिकरणाच्या निर्णयानुसार आवश्यक तेथे नोंदवहीमध्ये दुरुस्ती करील.

(७) नोंदवहीमध्ये नाव नोंदण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल.

(८) परिषद घटित करण्यात आल्यानंतर नोंदवही तिच्या ताब्यात देण्यात येईल आणि पहिल्या नोंदवहीमध्ये नोंदणी करण्यासाठी मिळालेली संपूर्ण अर्ज-फी किंवा तिचा कोणताही विनिर्दिष्ट भाग परिषदेच्या नावावर जमा करण्यात यावा, असा निदेश केंद्र सरकार देऊ शकेल.

**नोंदवहीमध्ये नोंद होण्यासाठी अर्हता.**

२५. एखादी व्यक्ती भारतामध्ये राहत असेल किंवा वास्तुशास्त्रज्ञ म्हणून व्यवसाय करत असेल आणि—

(क) मान्यताप्राप्त अर्हता धारण करत असेल, किंवा

(ख) अशी अर्हता धारण करत नसेल परंतु, भारताचा नागरिक असून कलम २४, पोट-कलम (२) अन्वये नियत केलेल्या दिनांकापूर्वी पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी वास्तुशास्त्रज्ञ म्हणून व्यवसाय करत आलेली असेल, किंवा

(ग) नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा इतर अर्हता तिच्याकडे असतील, तर, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर ती व्यक्ती, नोंदवहीमध्ये तिच्या नावाची नोंद करून घेण्यास हक्कदार असेल :

परंतु, भारताच्या नागरिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती,---

(क) अशी व्यक्ती भारताबाहेरील ज्या देशातील असेल त्या देशाचा कायदा व प्रथा यानुसार त्या देशात नोंदणीयोग्य असलेली वास्तुशास्त्रातील अर्हता धारण करणाऱ्या भारताच्या नागरिकांना अशा देशामध्ये वास्तुशास्त्रज्ञ म्हणून व्यवसाय सुरू करण्यास व चालवण्यास परवानगी नसेल तर कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये मान्यताप्राप्त असलेल्या अशा, किंवा

(ख) देवाणघेवाणीच्या योजनेच्या अनुषंगाने किंवा अन्यथा केंद्र सरकारने एखादी अर्हता कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये मान्यताप्राप्त अर्हता म्हणून घोषित केलेली नसेल तर,

अशा अर्हतेच्या आधारावर नोंदणी केली जाण्यास हक्कदार असणार नाही.

**नंतरच्या नोंदणीची कार्यपद्धती.**

२६. (१) वास्तुशास्त्रज्ञांच्या पहिल्या नोंदवहीमधील नोंदणीसाठीचे अर्ज स्वीकारण्यासाठी नियत केलेल्या दिनांकानुसार नोंदणीसाठी करावयाचे सर्व अर्ज परिषदेच्या निबंधकाला उद्देशून लिहिण्यात येतील व त्यासोबत, नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात येईल.

(२) अशा अर्जावरून निबंधकाचे, अर्जदार नोंदवहीमध्ये त्याच्या नावाची नोंद करवून घेण्यास हक्कदार आहे, असे मत होईल तर, निबंधक त्यानंतर नोंदवहीमध्ये अर्जदाराच्या नावाची नोंद करील :

परंतु, या अधिनियमाच्या उपबंधानुसार जिचे नाव नोंदवहीमधून काढून टाकण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, परिषदेच्या मान्यतेने असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत नोंदवहीमध्ये तिच्या नावाची पुन्हा नोंदणी करवून घेण्यास हक्कदार असणार नाही.

(३) नोंदणी बद्दलचा जिचा अर्ज निबंधक फेटाळील त्या कोणत्याही व्यक्तीला अशा फेटाळणीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत परिषदेकडे अपील करता येईल.

(४) या कलमान्वये नोंदवहीमध्ये एखाद्या नावाची नोंद करण्यात आल्यानंतर निबंधक, नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल.

नवीकरण फी.

**२७.** (१) केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, एखाद्या नोंदवहीमध्ये प्रथम नोंद केल्याच्या वर्षाच्या पुढील वर्षामधील डिसेंबरच्या ३१ तारखेनंतर ते नाव नोंदवहीमध्ये तसेच ठेवण्यासाठी नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी नवीकरण फी, परिषदेला दरवर्षी देण्यात येईल आणि असा निदेश देण्यात येईल आणि असा निदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत, अशी नवीकरण फी, ती ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षामधील एप्रिलच्या १ तारखेपूर्वी देय होईल.

(२) नवीकरण फी नियत दिनांकापासून भरण्यात येणार नाही त्या बाबतीत, निबंधक कसूरदाराचे नाव नोंदवहीमधून काढून टाकील :

परंतु, अशा रीतीने काढून टाकलेले नाव, नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्तींवर नोंदवहीमध्ये पुनःस्थापित करता येइल.

(३) नवीकरण फी भरण्यात आल्यानंतर निबंधक, नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने नोंदणी प्रमाणपत्र तद्नुसार पृष्ठांकित करील.

अतिरिक्त अर्हतेची नोंद.

**२८.** नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर वास्तुशास्त्रज्ञ, तो प्राप्त करील अशा आणखी कोणत्याही मान्यताप्राप्त अर्हतेची नोंदवहीमध्ये नोंद करवून घेण्यास हक्कदार असेल.

नोंदवहीमधून काढून टाकणे.

**२९.** परिषदेला,---

(क) ज्याने आपले नाव नोंदवहीमधून काढून टाकण्यात यावे अशी विनंती केलेली असेल, अशा, किंवा

(ख) नोंदवहीच्या शेवटच्या प्रकरणानंतर जो मरण पावलेला असेल अशा कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञाचे नाव आदेशाद्वारे नोंदवहीतून काढून टाकता येईल.

(२) कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि परिषदेला आणखी कोणतीही चौकशी करणे योग्य वाटल्यास अशी चौकशी केल्यानंतर,---

(क) त्या वास्तुशास्त्रज्ञाच्या नावाची नोंद नोंदवहीमध्ये चुकीने किंवा महत्त्वाच्या तथ्याचा विपर्यास केल्यामुळे अथवा ते दाबून टाकल्यामुळे करण्यात आलेली आहे, किंवा

(ख) परिषदेच्या मते नैतिक अधःपात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल त्यास सिद्धदोष ठरवण्यात आलेले आहे, किंवा

(ग) तो अविमुक्त नादार आहे, किंवा

(घ) सक्षम न्यायालयाने तो विकल मनाचा असल्याचे न्यायनिर्णीत केलेले आहे ;

अशी परिषदेची खात्री होईल त्याबाबतीत, परिषद या कलमाच्या उपबंधांच्या अधीन राहून, त्या वास्तुशास्त्रज्ञाचे नाव नोंदवहीमधून काढून टाकावे, असा निदेश देऊ शकेल.

(३) ज्याचे नाव नोंदवहीमधून काढून टाकण्यात येईल तो कोणताही वास्तुशास्त्रज्ञ, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी, या अधिनियमान्वये नोंदणीस अपात्र राहील, असा निदेश पोटकलम (२) अन्वये कोणत्याही आदेशामध्ये देता येईल.

(४) पोटकलम (२) अन्वयेच्या आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्याखेरीज तो आदेश अंमलात येणार नाही.

गैरवर्तनाच्या संबंधातील चौकशी मधील कार्यवाही.

**३०.** (१) परिषदेकडे करण्यात आलेली तक्रार मिळाल्यानंतर, कोणताही वास्तुशास्त्रज्ञ व्यावसायिक गैरवर्तन केल्याबद्दल दोषी आहे, असे परिषदेचे मत होईल आणि ते गैरवर्तन सिद्ध झाल्यास तो वास्तुशास्त्रज्ञ म्हणून व्यवसाय करण्यास अयोग्य होणार असेल, तेव्हा परिषदेला, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने चौकशी करता येईल ;

(२) पोटकलम (१) अन्वये चौकशी केल्यानंतर आणि त्या वास्तुशास्त्रज्ञाची बाजू ऐकून घेतल्यानंतर, परिषदेला आदेशाद्वारे उक्त वास्तुशास्त्रज्ञाला ताकीद देता येईल किंवा वास्तुशास्त्रज्ञ म्हणून व्यवसाय करण्यापासून त्याला निलंबित करता येईल किंवा नोंदवहीमधून त्याचे नाव काढून टाकता येईल किंवा तिला योग्य वाटेल असा दुसरा आदेश देता येईल.

प्रमाणपत्रे स्वाधीन करणे.

**३१.** कलम २७, पोटकलम (२) किंवा कलम २९, पोटकलम (१) अथवा पोटकलम (२) किंवा कलम ३० चे पोटकलम (२) अन्वये जिचे नाव नोंदवहीमधून काढून टाकण्यात आलेले असेल ती व्यक्ती, किंवा अशी व्यक्ती मरण पावलेली असेल त्या बाबतीत तिचा दिवाणी प्रक्रिया संहिता,

१९०८ याचे कलम २, खंड (११) मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेला वैध प्रतिनिधी, त्याचे नोंदणी प्रमाणपत्र ताबडतोब निबंधकाच्या स्वाधीन करील आणि अशा रीतीने काढून टाकलेले नाव **राजपत्रात** प्रकाशित करण्यात येईल.

**नोंदवहीमध्ये पुनःस्थापना.**

**३२.** परिषद, कोणत्याही वेळी तिला पुरेशी वाटतील अशा कारणांसाठी आणि केंद्र सरकारच्या मान्यतेच्या अधीन राहून, असा आदेश देऊ शकेल की, नोंदवहीमधून काढून टाकलेले नाव, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात आल्यानंतर नोंदवहीमध्ये पुनःस्थापित करण्यात येईल.

**प्रमाणपत्रांची दुसरी प्रत देणे.**

**३३.** एखादे नोंदणी प्रमाणपत्र हरवलेले आहे किंवा नष्ट झालेले आहे, अशी निबंधकाची खात्री होईल अशा रीतीने दाखवून देण्यात येईल तेथे, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात आल्यानंतर निबंधक विहित नमुन्यात प्रमाणपत्राची दुसरी प्रत देऊ शकेल.

**नोंदवहीचे मुद्रण.**

**३४.** प्रत्येक वर्षी एप्रिलच्या १ तारखेनंतर, शक्य होईल तितक्या लवकर, निबंधक, नोंदवही उक्त तारखेस जशी असेल तशा तिच्या प्रती मुद्रित करण्याची व्यवस्था करील आणि अशा प्रतींसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींना त्या प्रती, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येतील व त्या प्रती म्हणजे, उक्त तारखेस ज्या व्यक्तींची नावे नोंदवहीमध्ये नोंदली असतील त्या व्यक्ती वास्तुशास्त्रज्ञ होत्या, याबद्दलचा पुरावा असतील.

**नोंदणीचा परिणाम.**

**३५.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये असलेला वास्तुशास्त्रज्ञासंबंधीचा निर्देश हा, या अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या वास्तुशास्त्रज्ञासंबंधीचा निर्देश असल्याचे मानण्यात येईल.

(२) कलम २४, पोटकलम (२) अन्वये नियत केलेल्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, नोंदवहीमध्ये नाव नोंदलेल्या व्यक्तीला, केंद्र किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली अथवा सार्वजनिक निधीमधून खर्च चालवला जात असेल किंवा सहाय्य दिले जात असेल अशा इतर कोणत्याही स्थानिक निकायामध्ये, किंवा संस्थेमध्ये अथवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संस्थेमध्ये, वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नियुक्ती केली जाण्यास अधिमान दिला जाईल.

## प्रकरण चार

## संकीर्ण

**नोंदणी झालेली असल्याचा खोटा दावा सांगण्याबद्दल शास्ती.**

**३६.** नोंदवहीमध्ये त्या वेळेपुरती जिच्या नावाची नोंद झालेली नसेल ती कोणतीही व्यक्ती, अशा रीतीने नोंदलेले आहे असे खोटे अभिवेदन करील किंवा तिचे नाव अशा रीतीने नोंदलेले आहे, असे सूचित करण्यासाठी संयुक्तिकपणे पूर्वकल्पित केलेले कोणतेही शब्द किंवा अक्षरे तिच्या नावाच्या किंवा अभिधानाच्या संबंधात वापरील तर, ती व्यक्ती एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

**अभिधानाच्या वापरास प्रतिषेध.**

**३७.** (१) कलम २४, पोटकलम (२) अन्वये नियत केलेल्या तारखेपासून एक वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर नोंदलेल्या वास्तुशास्त्रज्ञाव्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती किंवा वास्तुशास्त्रज्ञांची भागीदारी संस्था त्या वास्तुशास्त्रज्ञाच्या अभिधानाचा आणि अभिनामाचा वापर करणार नाही :

परंतु,---

(क) " भूदृश्य वास्तुशास्त्रज्ञ " किंवा " नाविक वास्तुशास्त्रज्ञ " म्हणून पदनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती करीत असलेल्या वास्तुशास्त्रज्ञाच्या पेशास ;

(ख) भारताबाहेरील कोणत्याही देशामध्ये वास्तुशास्त्रज्ञाचा पेशा चालवणारी जी व्यक्ती केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीने विनिर्दिष्ट प्रकल्पासाठी भारतामध्ये समंत्रक किंवा संकल्पक म्हणून कामाची जबाबदारी पत्करील त्या व्यक्तीस,

या कलमाचे उपबंध लागू होणार नाहीत.

**स्पष्टीकरण.**---खंड (क) च्या प्रयोजनार्थ,---

(एक) " भूदृश्य वास्तुशास्त्रज्ञ " याचा अर्थ, वनस्पती, झाडे आणि भूदृश्य यांच्याशी संबंधित खुल्या जागांच्या संकल्पनाच्या संबंधातील काम करणारी व्यक्ती, असा आहे ;

(दोन) " नाविक वास्तुशास्त्रज्ञ " याचा अर्थ, जहाजांचे संकल्पचित्र व बांधणी यांच्या संबंधात काम करणारी व्यक्ती, असा आहे.

(२) कोणतीही व्यक्ती पोटकलम (१) च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करील तर ती, पहिल्या दोषसिद्धीबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि त्यानंतरच्या कोणत्याही दोषसिद्धीबद्दल, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात कसूर.

३८. नोंदवहीमधून जिचे नाव काढून टाकण्यात आलेले आहे अशी कोणतीही व्यक्ती तिचे नोंदणी प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात पुरेशा कारणावाचून कसूर करील तर, तो शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि कसूर करण्याचे ती व्यक्ती चालू ठेवील त्या प्रकरणी, ती अशी कसूर चालू ठेवील त्या पहिल्या दिवसानंतरच्या प्रत्येक दिवसासाठी दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडास पात्र होईल.

अपराधाची दखल.

३९. (१) परिषदेच्या किंवा परिषदेने या संबंधात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या तक्रारीवरून असेल ती व्यतिरिक्त इतर बाबतीत, कोणतेही न्यायालय या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

(२) इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी या व्यतिरिक्त अन्य कोणताही दंडाधिकारी या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

परिषदेने द्यावयाची माहिती व तिचे प्रकाशन.

४०. (१) परिषद, केंद्र सरकारास आवश्यक वाटतील असे अहवाल, तिच्या कार्यवृत्तांच्या प्रती आणि इतर माहिती देईल.

(२) केंद्र सरकार या कलमान्वये त्याला देण्यात आलेला कोणताही अहवाल, प्रत किंवा इतर माहिती त्याला आवश्यक वाटेल अशा रीतीने प्रकाशित करू शकेल.

सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

४१. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम अथवा विनियम या अन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल केंद्र सरकार, परिषद किंवा परिषदेच्या कार्यकारी समितीचा किंवा इतर कोणत्याही समितीचा कोणताही सदस्य, किंवा परिषदेचा अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

परिषदेचे सदस्य आणि अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

४२. परिषदेचे सदस्य आणि परिषदेचे अधिकारी व अन्य कर्मचारी हे, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

अडचणी दूर करण्याची शक्ती.

४३. (१) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, केंद्र सरकारला अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे, या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसलेले उपबंध **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे करता येतील :

परंतु, या अधिनियमाचा प्रारंभ झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर या कलमान्वये असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये देण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो दिल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल आणि कलम ४४, पोटकलम (३) चे उपबंध हे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाच्या संबंधात जसे लागू होतात तसेच ते अशा आदेशाच्या संबंधात लागू होतील.

केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती.

४४. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील :---

(क) प्रकरण दोन अन्वये निवडणुका घेण्याची रीत, कलम ५, पोटकलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या अधिकरणाच्या सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि अधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ख) कलम १४, पोटकलम (२) च्या परंतुकान्वये घटित केलेल्या तज्ज्ञ समितीने आपले कामकाज चालवताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि तज्ज्ञ समितीच्या शक्ती व कर्तव्ये आणि तिच्या सदस्यांना प्रदेय प्रवास व दैनिक भत्ता ;

(ग) कलम २३, पोटकलम (३) अन्वये वास्तुशास्त्रज्ञांच्या नोंदवहीत समाविष्ट करावयाचा तपशील ;

(घ) कलम २४, पोटकलम (७), कलम २६, पोटकलम (४) आणि कलम ३३ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र ज्या नमुन्यात द्यावयाचे तो नमुना ;

(ङ) कलम २४, २५, २६, २७, २८, ३२ आणि ३३ अन्वये द्यावयाची फी ;

(च) कलम २७ च्या पोटकलम (२) च्या परंतुकान्वये नोंदवहीत नाव ज्या शर्तीवर पूर्ववत प्रस्थापित करता येईल त्या शर्ती ;

(छ) कलम २७, पोटकलम (३) अन्वये पृष्ठांकन करण्याची रीत ;

(ज) परिषद, कलम ३० अन्वये ज्या रीतीने चौकशी करील ती रीत ;

(झ) कलम ३४ अन्वये नोंदवहीच्या मुद्रित प्रती पुरविल्याबद्दल फी ;

(ञ) या अधिनियमाखालील नियमांद्वारे जिच्यासाठी उपबंध करावयाचा आहे किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि अशा प्रकारे तो ज्या सत्रामध्ये ठेवला असेल ते सत्र किंवा त्यांच्या पाठोपाठची पूर्वोक्त सत्रे संपण्यापूर्वी त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**विनियम करण्याची परिषदेची शक्ती.**

**४५.** (१) परिषदेला, या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी, केंद्र सरकारच्या संमतीने [1][**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे], हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधांशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा विनियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येतील :—

(क) परिषदेच्या संपत्तीची व्यवस्था ;

(ख) परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या शक्ती व कर्तव्ये ;

(ग) परिषद आणि कार्यकारी समिती किंवा कलम १० अन्वये घटित केलेली इतर कोणतीही समिती यांच्या सभा बोलावणे व घेणे, ज्या वेळी व ज्या ठिकाणी अशा सभा घ्यायच्या त्या वेळा व ती ठिकाणे, त्या सभांमधील कामकाज चालविणे आणि गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली व्यक्तींची संख्या ;

(घ) कार्यकारी, समितीची किंवा कलम १० अन्वये घटित केलेल्या इतर कोणत्याही समितीची कामे ;

(ङ) कोणताही अभ्यास आणि व्यावहारिक प्रशिक्षण सुरू करावयाचे असल्यास त्याचे पाठ्यक्रम आणि कालावधी, परीक्षांचे विषय आणि मान्यताप्राप्त अर्हता देण्यासाठी कोणत्याही महाविद्यालयामध्ये किंवा संस्थेमध्ये त्या विषयांमधील नैपुण्यांची जी मानके प्राप्त करावी लागतील, ती मानके ;

(च) निरीक्षकाची नियुक्ती, शक्ती व कर्तव्ये ;

(छ) वास्तुशास्त्राच्या शिक्षणासाठी असलेला कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, जागा, प्रशिक्षणाच्या व इतर सोयी यांची मानके ;

(ज) व्यावसायिक परीक्षा घेणे, परीक्षकांच्या अर्हता आणि अशा परीक्षांसाठी प्रवेश देण्याबाबतच्या शर्ती ;

(झ) व्यावसायिक वर्तन व शिष्टाचार यांची मानके आणि वास्तुशास्त्रज्ञांनी पालन करावयाची आचारसंहिता ;

(ञ) या अधिनियमाखाली विनियमांद्वारे जिच्यासाठी उपबंध करावयाचा आहे किंवा करता येईल आणि जिच्या संबंधात कोणतेही नियम करण्यात आलेले नाहीत, अशी कोणतीही बाब.

---

१. १९८२ चा अधिनियम २१, कलम २ (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१८ मे १९८२ रोजी व तेव्हापासून).

[१][ (३) या कलमान्वये केलेला प्रत्येक विनियम, तो केल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि अशा प्रकारे तो ज्या सत्रामध्ये ठेवला असेल ते सत्र किंवा त्याच्या पाठोपाठची पूर्वोक्त सत्रे संपण्यापूर्वी, त्या विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो विनियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

## अनुसूची

(पहा कलम १४)

### अर्हता

१. केंद्रीय किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापन करण्यात आलेल्या भारतीय विद्यापीठांनी प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील स्नातक पदवी.

२. अखिल भारतीय परिषदेने तंत्र शिक्षणासाठी प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील राष्ट्रीय पदविका (पूर्वीची अखिल भारतीय पदविका).

३. भारतीय तंत्रविज्ञान संस्था, खडगपूर यांनी प्रदान केलेली डिग्री ऑफ बॅचलर ऑफ आर्किटेक्चर (बी. आर्क.).

४. सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई यांनी १९४१ नंतर प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील पाच वर्षांची पूर्णकालिक पदविका.

५. आंध्र प्रदेश शासनाच्या राज्य शिक्षण व प्रशिक्षण मंडळाने १९६० पासून प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील पदविका (शासकीय कला व वास्तुशास्त्र महाविद्यालय, हैद्राबाद येथे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी).

६. शासकीय कला व वास्तुशास्त्र महाविद्यालय, हैद्राबाद यांना १९५९ पर्यंत प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील पदविका; मात्र, संबंधित उमेदवार त्यानंतर आंध्र प्रदेशाच्या राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या विशेष अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेला असावा आणि त्याने विशेष प्रमाणपत्र मिळवलेले असावे, ही शर्त असेल.

७. शासकीय तंत्र निकेतन, नागपूर येथे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाने १९६५ पासून प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील पदविका.

८. महाराष्ट्र शासनाने (किंवा भूतपूर्व मुंबई शासनाने) प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील शासकीय पदविका.

९. कलाभवन तंत्र संस्था, बडोदा यांची वास्तुशास्त्रातील पदविका.

१०. वास्तुशास्त्र विद्यालय, अहमदाबाद यांनी प्रदान केलेली वास्तुशास्त्रातील पदविका.

११. भारतीय वास्तुशास्त्र संस्थेचे सदस्यत्व.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम २ (दोन) द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले (१८ मे, १९८२ रोजी व तेव्हापासून).

# THE ARCHITECTS ACT, 1972

## वास्तुशास्त्रज्ञ अधिनियम, १९७२

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| accommodation | निवासव्यवस्था | [sec. 19 (2)] |
| aforesaid | पूर्वोक्त | [sec. 14 (2)] |
| aggrieved | व्यथित | [sec. 5 (2)] |
| allowances | भत्ते | [sec. 11] |
| acquire | संपादन | [sec. 3 (1)] |
| acquisition | संपादन | [sec. 13 (7)] |
| amendment | दुरुस्ती, | [sec. 24 (6)] |
| | विशोधन | [sec. 14 (2)] |
| application | उपयोजन | [sec. 13 (7)] |
| appointment | नियुक्ती | [sec. 12 (1)(a)] |
| appropriate government | समुचित शासन | [sec. 20 (2)] |
| architects | वास्तुशास्त्रज्ञ | [title] |
| Architecture | वास्तुशास्त्र | [sec. 3] |
| arise | उद्‌भवणे | [sec. 5 (2)] |
| audited account | लेखापरीक्षित लेखा | [sec. 13 (5)] |
| be borne | भागवणे | [sec. 5 (3)] |
| body corporate | निगमनिकाय | [sec. 3 (1)] |
| business | कामकाज | [sec. 9 (1)] |
| casting vote | निर्णायक मत | [sec. 9 (3)] |
| casual | निमित्तवश, नैमित्तिक | [sec. 6 (4)] |
| certificate of registration | नोंदणी प्रमाणपत्र | [sec. 26 (4)] |
| code of ethics | नीतिसंहिता | [sec. 22 (1)] |
| cognizance | दखल | [sec. 39 (1)] |
| common seal | सामाईक मोहोर | [sec. 3 (1)] |
| concerned | संबंधित | [sec. 3 (5)] |
| conduct | वर्तन | [sec. 22(M.N.)] |
| confer | प्रदान | [sec. 10 (5)] |
| consecutive | लागोपाठ | [sec. 6 (3)(I)] |
| constituted | घटित | [sec. 2 (b)] |
| constitution | घटना | [sec. 7 (a)] |
| consultant | संमंत्रक | [sec. 37 (1)(b)] |
| consultation | विचारविनिमय | [sec. 3 (5)] |
| contained | अंतर्भूत | [sec. 3 (4)] |
| contract | संविदा | [sec. 3 (1)] |

| | | |
|---|---|---|
| contravene | व्यतिक्रमण | [sec. 37 (2)] |
| convicted | सिद्धदोष | [sec. 8 (b)] |
| conviction | दोषसिद्धी | [sec. 37 (2)] |
| council | परिषद | [sec. 2 (b)] |
| course of study | पाठ्यक्रम | [sec. 18] |
| decision | निर्णय | [sec. 5 (2)] |
| declaration | घोषणा | [sec. 5 (2)] |
| defect | दोष | [sec. 7 (a)] |
| deposit | ठेव | [sec. 13 (6)(a)] |
| design | संकल्पचित्र | [sec. 37 (1)(Exp.)(II)] |
| designated | पदनिर्देशित | [sec. 37 (1)(a)] |
| designer | संकल्पक | [sec. 37 (1)(b)] |
| diploma | पदविका | [schedule 4] |
| discharge | पार पाडणे | [sec. 4 (1)] |
| disposal | विल्हेवाट | [sec. 3 (1)] |
| dispute | विवाद | [sec. 5 (2)] |
| division | विभागणी | [sec. 9 (3)] |
| duty | कर्तव्य | [sec. 4 (3)] |
| elected | निर्वाचित | [sec. 6 (1)] |
| eligible | पात्र | [sec. 4 (2)] |
| entitled | हक्कदार | [sec. 11] |
| enrolment | नावनोंदणी | [sec. 17] |
| equipment | साधनसामग्री | [sec. 19 (2)] |
| etiquette | शिष्टाचार | [sec. 22 (1)] |
| excuse | सबब | [sec. 6 (3)(I)] |
| ex-officio | पदसिद्ध | [sec. 3 (3)(d)] |
| expedient | समयोचित | [sec. 43 (1)] |
| expenses | खर्च | [sec. 12 (1)] |
| expert | तज्ञ | [sec. 44 (2)(b)] |
| fee | द्रव्यदंड | [sec. 36] |
| final | अंतिम | [sec. 5 (2)] |
| foregoing power | पूर्वगामी शक्ती | [sec. 44 (2)] |
| full-time instruction | पूर्वकालिक शिक्षण | [sec. 3 (3)(c)] |
| gift | देणगी | [sec. 13 (6)(a)] |
| grant | अनुदान | [sec. 13 (6)(a)] |
| have effect | परिणामकारक | [sec. 22 (2)] |

| | | |
|---|---|---|
| Have effect | परिणामकारक | [sec. 22 (2)] |
| Head | प्रमुख | [sec. 3 (3)(c)] |
| Hold | धारण करणे | [sec. 3 (1)] |
| immovable | जंगम | [sec. 3 (1)] |
| implied | ध्वनित | [sec. 24 (4)] |
| impose | लादणे | [sec. 10 (5)] |
| ineligible | अपात्र | [sec. 8 (b)] |
| infamous conduct | अतिनिंद्य वर्तन | [sec. 22 (2)] |
| in particular | विशेषतः | [sec. 44 (2)] |
| in pursuance of– | –च्या अनुषंगाने | [sec. 25 (pro.)(b)] |
| institute | संस्था | [sec. 2 (c)] |
| interfere | हस्तक्षेप | [sec. 19 (2)] |
| irregularity | नियमबाह्य गोष्ट | [sec. 7 (c)] |
| inspector | निरीक्षक | [sec. 19 (1)] |
| landscape arctited | भूदृश्य वास्तुशास्त्रज्ञ | [sec. 37 (1)(a)] |
| late | भूतपूर्व | [sec. 3 (3)(b)] |
| liabilities insurred | पत्करलेली दायित्वे | [sec. 13 (1)] |
| magistrate | दंडाधिकारी | [sec. 39 (2)] |
| majority | बहुमत | [sec. 9 (2)] |
| merit | गुणावगुण | [sec. 7 (c)] |
| ministry | मंत्रालय | [sec. 3 (3)(b)] |
| mode | पद्धत | [sec. 5 (M.N.)] |
| movable | स्थावर | [sec. 3 (1)] |
| nationalism | राष्ट्रीयत्त्व | [sec. 23 (3)(3)(क)] |
| naval architect | नाविक वास्तुशास्त्रज्ञ | [sec. 37 (1)(a)] |
| nominated | नामनिर्देशित | [sec. 3 (3)(b)] |
| Notification | अधिसूचना | [sec. 3 (1)] |
| observance | पालन | [sec. 9 (1)] |
| ordinary meeting | सामान्य सभा | [sec. 6 (3)(I)] |
| organisation | संघटना | [sec. 3 (3)(b] |
| payable | प्रदेय | [sec. 44 (2)(b)] |
| period | कालावधी | [sec. 3 (5)] |
| perpetual succession | उत्तराधिकाराची निरंतर परंपरा | [sec. 3 (1)] |
| pleasure | मर्जी | [sec. 12 (2)] |
| power | शक्ती | [sec. 10 (5)] |
| practice | प्रथा | [sec. 25 (pro.)(a)] |
| preference | अधिमान | [sec. 35 (2)] |

| | | |
|---|---|---|
| prescribed | विहित | [sec. 9 (1)] |
| presidency | इलाखा | [sec. 39 (2)] |
| previous sanction | पूर्वमंजुरी | [sec. 11] |
| profession | पेशा | [sec. 37 (1)(a)] |
| professional misconduct | व्यावसायिक गैरवर्तन | [sec. 22 (2)] |
| proficiency | नैपुण्य | [sec. 20 (1)(a)] |
| prohibition | प्रतिषेध | [sec. 37 (M.N.)] |
| property | संपत्ती | [sec. 3 (1)] |
| punishable | शिक्षापात्र | [sec. 39 (1)] |
| qualified | अर्हताप्राप्त | [sec. 3 (5)] |
| quorum | गणपूर्ती | [sec. 9 (2)] |
| reasonably | सयुक्तिकपणे | [sec. 36] |
| reciprocity | देवाणघेवाण | [sec. 15 (1)] |
| recognised | मान्यताप्राप्त | [sec. 14 (1)] |
| recognised qualification | मान्यताप्राप्त अर्हता | [sec. 2 (b)] |
| recommendation | शिफारस | [sec. 19 (1)] |
| re-election | फेरनिवड | [sec. 4 (2)] |
| referred to | निर्देशिलेला | [sec. 6 (3) (II)] |
| register | नोंदवही | [कलम २ (a)] |
| registerable | नोंदणीयोग्य | [sec. 25 (pro.)(a)] |
| registrar | निबंधक | [sec. 12 (1)(a)] |
| registration tribunal | नोंदणी अधिकरण | [sec. 24 (1)] |
| regulation | विनियम | [sec. 2 (f)] |
| release | सुटका | [sec. 8 (b)] |
| re-nomination | फेरनाम निर्देशन | [sec. 6 (5)] |
| revenue | महसूल | [sec. 13 (3)] |
| remarks | अभिप्राय | [sec. 19 (2)] |
| report | अहवाल | [sec. 13 (5)] |
| representation | अभिवेदन | [sec. 20 (1)(d)] |
| required | अपेक्षित | [sec. 20 (1)(a)] |
| residence | निवासस्थान | [sec. 23 (3)(3)(a)] |
| resignation | राजीनामा | [sec. 4 (2)(a)] |
| restored | प्रस्थापित | [sec. 44 (2)(f)] |
| rule | नियम | [sec. 2 (g)] |
| said | उक्त | [sec. 3 (4)] |
| secretary | सचिव | [sec. 12 (1)(a)] |

| | | |
|---|---|---|
| security | प्रतिभूती | [sec. 13 (2)] |
| standard | मानक | [sec. 20 (1)(b)] |
| standing to one's credit | जमाखाती शिल्लक असलेले | [sec. 13 (2)] |
| style | अभिनाम | [sec. 37 (1)] |
| subject to — | ---- च्या आधीन | [sec. 4 (2)] |
| sufficient | पुरेशी | [sec. 6 (3)(I)] |
| suit | दावा | [sec. 3 (1)] |
| surender | स्वाधीन | [sec. 38 (M.N.)] |
| technique | तंत्र | [sec. 3 (3)(b)] |
| term | अवधी | [sec. 6 (5)] |
| term of office | पदावधी | [sec. 6 (M.N.)] |
| title | अभिधान | [sec. 37 (M.N.)] |
| to allot | सोपवणे | [sec. 3 (3)(b)] |
| to caluable to sub | पूर्वकल्पित करणे | [sec. 36] |
| to deem | मानणे | [sec. 6 (3)] |
| to elect | निवडणे | [sec. 3 (a)] |
| to enter upon office | पदग्रहण करणे | [sec. 4 (2)(b)] |
| to expire | समाप्त होणे | [sec. 4 (2)(b)] |
| to express | व्यक्त करणे | [sec. 24 (4)] |
| to fix | निश्चित करणे | [sec. 11] |
| to hold office | पद धारण करणे | [sec. 3 (5)] |
| to reject | फेटाळणे | [sec. 26 (3)] |
| to vacate | रिक्त करणे | [sec. 6 (3)] |
| training | प्रशिक्षण | [sec. 19 (2)] |
| transfer | हस्तांतरण | [sec. 13 (7)] |
| treasurer | कोषाध्यक्ष | [sec. 12 (1)(a)] |
| tribunal | अधिकरण | [sec. 5 (2)] |
| understanding | उपक्रम | [sec. 13 (7)] |
| undischarged insolvent | अविमुक्त नादार | [sec. 8 (a)] |
| university | विद्यापीठ | [sec. 15 (1)] |
| vacancy | रिक्तपद | [sec. 6 (M.N.)] |
| violation | भंग | [sec. 22 (2)] |
| voting | मत देणे | [sec. 9 (2)] |
| withdrawal | मागे घेणे | [sec. 20 (M.N.)] |

# वास्तुशास्त्रज्ञ अधिनियम, १९७२

# THE ARCHITECTS ACT, 1972

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अतिनिंद्य वर्तन | infamous conduct | [कलम २२ (२)] |
| अधिकरण | tribunal | [कलम ५ (२)] |
| अधिमान | preference | [कलम ३५ (२)] |
| अधिसूचना | notification | [कलम ३ (१)] |
| अनुदान | grant | [कलम १३ (६)(क)] |
| अपात्र | ineligible | [कलम ८ (ख)] |
| अपेक्षित | required | [कलम २० (१)(क)] |
| अभिधान | title | [कलम ३७ (स.टी.)] |
| अभिनाम | style | [कलम ३७ (१)] |
| अभिप्राय | remarks | [कलम १९ (२)] |
| अभिवेदन | representation | [कलम २० (१)(ख)] |
| अर्हताप्राप्त | qualified | [कलम ३ (५)] |
| अवधी | term | [कलम ६ (५)] |
| अविमुक्त नादार | undischarged insolvent | [कलम ८ (क)] |
| अहवाल | report | [कलम १३ (५)] |
| अंतर्भूत | contained | [कलम ३ (४)] |
| अंतिम | final | [कलम ५ (२)] |
| इलाखा | presidency | [कलम ३९ (२)] |
| उक्त | said | [कलम ३ (४)] |
| उत्तराधिकाराची निरंतर परंपरा | perpetual sucession | [कलम ३ (१)] |
| उद्भवणे | arise | [कलम ५ (२)] |
| उपक्रम | understanding | [कलम १३ (७)] |
| आयोजन | application | [कलम १३ (७)] |
| कर्तव्य | duty | [कलम ४ (३)] |
| कामकाज | business | [कलम ९ (१)] |
| कालावधी | period | [कलम ३ (५)] |
| कोषाध्यक्ष | treasurer | [कलम १२ (१)(क)] |
| खर्च | expenses | [कलम १३ (९)] |
| गणपूर्ती | quorum | [कलम ९ (२)] |
| गुणावगुण | merit | [कलम ७ (ग)] |
| घटना | constitution | [कलम ७ (क)] |
| घटित | constituted | [कलम २ (ख)] |
| घोषणा | declaration | [कलम ५ (२)] |

| | | |
|---|---|---|
| –च्या अनुषंगाने | –in pursuance of | [कलम २५ (परंतुक)(ख)] |
| –च्या आधीन | subject to– | [कलम ४ (२)] |
| जमाखाती शिल्लक असलेले | standing to one's credit | [कलम १३ (२)] |
| जंगम | immovable | [कलम ३ (१)] |
| ठेव | deposit | [कलम १३ (६)(क)] |
| तज्ञ | expert | [कलम ४४ (२)(ख)] |
| तंत्र | technique | [कलम ३ (३)(ख)] |
| दखल | cognizance | [कलम ३९ (१)] |
| दावा | suit | [कलम ३ (१)] |
| दुरुस्ती | amendment | [कलम २४ (६)] |
| देणगी | gift | [कलम १३ (६)(क)] |
| देवाणघेवाण | reciprocity | [कलम १५ (१)] |
| दोष | defect | [कलम ७ (क)] |
| दोषसिद्धी | conviction | [कलम ३७ (२)] |
| दंडाधिकारी | magistrate | [कलम ३९ (२)] |
| द्रव्यदंड | fee | [कलम ३६] |
| धारण करणे | Hold | [कलम ३ (१)] |
| ध्वनित | implied | [कलम २४ (४)] |
| नामनिर्देशित | nominated | [कलम ३ (३)(ख)] |
| नावनोंदणी | envolvement | [कलम १७] |
| नाविक वास्तुशास्त्रज्ञ | naval architect | [कलम ३७ (१)(ख)] |
| निगम निकाय | body corporate | [कलम ३ (१)] |
| निमित्तवश | casual | [कलम ६ (४)] |
| निबंधक | registrar | [कलम १२ (१)(क)] |
| नियम | rule | [कलम २ (छ)] |
| नियमबाह्य गोष्ट | irregularity | [कलम ७ (ग)] |
| नियुक्ती | appointment | [कलम १२ (१)(क)] |
| निरीक्षक | inspector | [कलम १९ (१)] |
| निर्णय | decision | [कलम ५ (२)] |
| निर्णायक मत | casting vote | [कलम ९ (३)] |
| निर्देशिलेला | referred | [कलम ६ (३)(दोन)] |
| निर्वाचित | elected | [कलम ६ (१)] |
| निवडणे | to elect | [कलम ३ (क)] |
| निवासव्यवस्था | accommodation | [कलम १९ (२)] |
| निवासस्थान | residence | [कलम २३ (३)(३)(क)] |
| निश्चित करणे | to fix | [कलम ११] |
| नीतिसंहिता | code of ethics | [कलम २२ (१)] |

| | | |
|---|---|---|
| नैपुण्य | proficiency | [कलम २० (१)(क)] |
| नैमित्तिक | casual | [कलम ६ (स.टी.)] |
| नोंदणी अधिकरण | registration tribunal | [कलम २४ (१)] |
| नोंदणी प्रमाणपत्र | certificate of registration | [कलम २६ (४)] |
| नोंदणीयोग्य | registerable | [कलम २५ (परंतुक)(क)] |
| नोंदवही | register | [कलम २ (क)] |
| पत्करलेली दायित्वे | liabilities insurred | [कलम १३ (१)] |
| पदग्रहण करणे | to enter upon office | [कलम ४ (२)(ख)] |
| पद धारण करणे | to hold office | [कलम ३ (५)] |
| पदनिर्देशित | designated | [कलम ३७ (१)(क)] |
| पदविका | diploma | [अनुसूची ४] |
| पदसिद्ध | ex-officio | [कलम ३ (३)(घ)] |
| पदावधी | term of office | [कलम ६ (स.टी.)] |
| पद्धत | mode | [कलम ५ (स.टी.)] |
| परिणामकारक | have effect | [कलम २२ (२)] |
| परिषद | council | [कलम २ (ख)] |
| पाठ्यक्रम | course of study | [कलम १८] |
| पात्र | eligible | [कलम ४ (२)] |
| पार पाडणे | discharge | [कलम ४ (१)] |
| पालन | observance | [कलम ९ (१] |
| पुरेशी | sufficient | [कलम ६ (३)(एक)] |
| पूर्वकल्पित करणे | to calculate to suggest | [कलम ३६] |
| पूर्णकालिक शिक्षण | full-time instruction | [कलम ३ (३) (ग)] |
| पूर्वगामी शक्ती | foregoing power | [कलम ४४ (२)] |
| पूर्वमंजुरी | previous sanction | [कलम ११] |
| पूर्वोक्त | aforesaid | [कलम १४ (२)] |
| पेशा | profession | [कलम ३७ (१)(क)] |
| प्रतिभूती | security | [कलम १३ (२)] |
| प्रतिषेध | prohibition | [कलम ३७ (स.टी.)] |
| प्रथा | practice | [कलम २५ (परंतुक)(क)] |
| प्रदान | conferred | [कलम १० (५)] |
| प्रदेय | payable | [कलम ४४ (२)(ख)] |
| प्रमुख | head | [कलम ३ (३)(ग)] |
| प्रशिक्षण | training | [कलम १९ (२)] |
| प्रस्थापित | restored | [कलम ४४ (२)(च)] |
| फेटाळणे | –to reject | [कलम २६ (३)] |
| फेरनामनिर्देशन | re-nomination | [कलम ६ (५)] |

| | | |
|---|---|---|
| फेरनिवड | re-election | [कलम ४ (२)] |
| बहुमत | majority | [कलम ९ (२)] |
| भत्ते | allowances | [कलम ११] |
| भागवणे | be borne | [कलम ५ (३)] |
| भूतपूर्व | late | [कलम ३ (३)(ख)] |
| भूदृश्य वास्तुशास्त्रज्ञ | landscape architect | [कलम ३७ (१)(क)] |
| भंग | violation | [कलम २२ (२)] |
| मत देणे | voting | [कलम ९ (२)] |
| मर्जी | pleasure | [कलम १२ (२)] |
| महसूल | revenue | [कलम १३ (३)] |
| मागे घेणे | withdrawal | [कलम २० (स.टी.)] |
| मानक | standard | [कलम २० (१)(ख)] |
| मानणे | to deem | [कलम ६ (३)] |
| मान्यताप्राप्त | recognised | [कलम १४ (१)] |
| मान्यताप्राप्त अर्हता | recognised qualification | [कलम २ (घ)] |
| मंत्रालय | ministry | [कलम ३ (३)(ख)] |
| राजीनामा | resignation | [कलम ४ (२)(क)] |
| राष्ट्रीयत्व | nationalism | [कलम २३. (३)(३)(क)] |
| रिक्त करणे | to vacate | [कलम ६ (३)] |
| रिक्त पद | vacancy | [कलम ६ (स.टी.)] |
| लागोपाठ | consecutive | [कलम ६ (३)(एक)] |
| लादणे | impose | [कलम १० (५)] |
| लेखापरीक्षित लेखा | audited account | [कलम १३ (५)] |
| वर्तन | conduct | [कलम २२ (स.टी.)] |
| वास्तुशास्त्र | Architecture | [कलम ३ (स.टी.)] |
| वास्तुशास्त्रज्ञ | architects | [शीर्षक] |
| विचारविनिमय | consultation | [कलम ३ (५)] |
| विद्यापीठ | university | [कलम १५ (१)] |
| विनिमय | regulation | [कलम २ (५)] |
| विभागणी | division | [कलम ९ (३)] |
| विल्हेवाट | disposal | [कलम ३ (१)] |
| विवाद | dispute | [कलम ५ (२)] |
| विशेषतः | in particular | [कलम ४४ (२)] |
| विशोधन | amendment | [कलम १४ (२)] |
| विहित | prescribed | [कलम ९ (१)] |
| व्यक्त करणे | to express | [कलम २४ (४)] |
| व्यतिक्रमण | contravene | [कलम ३७ (२)] |

| | | |
|---|---|---|
| व्यथित | aggrieved | [कलम ५ (२)] |
| व्यावसायिक गैरवर्तन | professional misconduct | [कलम २२ (२)] |
| शक्ती | power | [कलम १० (५)] |
| शिक्षापात्र | punishable | [कलम ३९ (१)] |
| शिफारस | recommendation | [कलम १९ (१)] |
| शिष्टाचार | etiquette | [कलम २२ (१)] |
| सचिव | secretary | [कलम १२ (१)(क)] |
| समयोचित | expedient | [कलम ४३ (१)] |
| समुचित शासन | appropriate government | [कलम २० (२)] |
| सबब | excuse | [कलम ६ (३)(एक)] |
| सयुक्तिकपणे | reasonably | [कलम ३६] |
| साधनसामग्री | equipment | [कलम १९ (२)] |
| समाप्त होणे | to expire | [कलम ४ (२)(ख)] |
| सामाईक मोहोर | common seal | [कलम ३ (१)] |
| सामान्य सभा | ordinary meeting | [कलम ६ (३)(एक)] |
| सुटका | release | [कलम ८ (ख)] |
| सिद्धदोष | convicted | [कलम ८ (ख)] |
| सोपवणे | to allot | [कलम ३ (३)(घ)] |
| संकल्पक | designer | [कलम ३७ (१)(ख)] |
| संकल्पचित्र | design | [कलम ३७ (१)(स्पष्टी)(दोन)] |
| संघटना | organisation | [कलम ३ (३)(घ)] |
| संपत्ती | property | [कलम ३ (१)] |
| संपादन | acquire,<br>acquisition | [कलम ३ (१)]<br>[कलम १३ (७)] |
| संबंधित | concerned | [कलम ३ (५)] |
| समंत्रक | consultant | [कलम ३७ (१)(ख)] |
| संविदा | contract | [कलम ३ (१)] |
| संस्था | institute | [कलम २ (ग)] |
| स्थावर | movable | [कलम ३ (१)] |
| स्वाधीन | surrender | [कलम ३८ (स.टी.)] |
| हक्कदार | entitled | [कलम ११] |
| हस्तक्षेप | interfere | [कलम १९ (२)] |
| हस्तांतरण | transfer | [कलम १३ (७)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई